पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
दिनांक 11/10/2019 (शुक्रवार)

---

## दुखापत

पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत 4 कि. मी. अंतरावर खदान क्र. 6, कन्हान येथे दिनांक 10/10/2019 चे 01:30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– धनराज नंदकावर कश्यप, वय 35 वर्ष, रा. खदान क्र. 6, कन्हान हे त्यांच्या परीवारसह घरी झोपले असतांना आरोपी नामे– शिवबाबु रामचंद्र सुर्यवंशी, रा. खदान क्र 6, कन्हान याने फिर्यादीच्या घरी अचानक प्रवेश केला. आरोपीला हा संशायस्पद वाटल्याने त्याला फिर्यादींच्या कुटुंबियांने पकडुन जाब विरल्यास आरोपीने तेथून पळ काढला. यानंतर फिर्यादी हे दोन भावांसह जाबविचारण्यास गेले असता आरोपीने हातोडीने फिर्यादीच्या डोक्यावर मारहाण करून गंभीर जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम 324 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. यातील आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक राहुल रंगारी हे करीत आहे.

## विनयभंग

पो.स्टे. खापरखेडा :– दि. 09/10/2019 चे 22:00 वा. ते 23:45 वा. चे सुमारास 28 वर्षीय पिडीत/फिर्यादी ही तिच्या लहान मुलासह घरी असतांना आरोपी नामे– ग्यानी भलावी, वय 55 वर्ष, रा. चनकापुर कॉलनी याने पिडीतेला अपशब्द बोलुन मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 354(अ) भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा संजय पायक हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर